# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
## कृषि नगर, वसमतरोड,
## परभणी– ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

ई-मेल: reg_mau@rediffmail.com    दूरध्वनी:(०२४५२)२२९७५५
वेबसाईट: www.vnmkv.ac.in    फॅक्स: (०२४५२)२२९७५५, २२३५८२


जा.क्र.निविदा प्रक्रीय-२०२०/प्रक-२/साप्रवि-६
दिनांक ०६/१०/२०२०

## परिपत्रक

**संदर्भ:** १. विद्यापीठ पत्र क्र.निविदा प्रक्रिया-२०२०/प्र.क्र.१/साप्रवि-६ दि.१६/०७/२०२०
२. विद्यापीठ परिपत्रक क्र.निविदा प्रक्रिया-२०२०/प्र.क्र.१/साप्रवि-६ दि.२७/०७/२०२०
३. विद्यापीठ परिपत्रक क्र.निविदा प्रक्रिया-२०२०/प्र.क्र.१/साप्रवि-६ दि.२१/०९/२०२०
४. विद्यापीठ परिपत्रक क्र.निविदा प्रक्रिया/परिपत्रक-२०२०/प्र.क्र.२/साप्रवि-६ दि.२४/०९/२०२०
५. विद्यापीठ परिपत्रक क्र.ई-निविदा बाबत-२०२०/प्र.क्र.१/साप्रवि-६ दि.३०/०९/२०२०

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत विविध विभागातील कार्यालयीन व प्रक्षेत्रावरील हंगामी कामे किमान वेतन कायदा व ईतर अनुषंगिक कायद्याचे व प्रचलीत शासन निर्णयाचे पालन करून वार्षिक रु. ३.०० लाखापेक्षा अधिक खर्च होत असलेल्या विभागास ई-निविदा प्रसारीत करुन कामे करुन घेण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. या प्रकरणी सरकारी कामगार अधिकारी, परभणी यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार विद्यापीठातील मनूष्यबळ पुरवठ्याची कामे ई-निविदेव्दारे वाटप करतांना कंत्राटदाराकडून सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांनी जारी केलेली अनूज्ञाप्तीची मागणी त्यांना काम वाटप केल्यानंतर एक महिन्याच्या आत करता येते.त्या अनुषंगाने सूचीत करण्यात येते की, मनूष्यबळ पुरवठा करुन घेण्याच्या ई-निविदेसाठी कागदपत्रांची मागणी करतांना सरकारी कामगार आयुक्त, नांदेड यांच्याकडून निर्गमीत होणारी अनूज्ञाप्तीची मागणी **सदरील काम वाटप झालेल्या कंत्राटदारांनी एक महिन्याच्या आत सादर करण्याची अट व तशी रु.१००/- च्या बंधपत्राची मागणी ई-निविदेत समाविष्ट करावी.** तसेच इतर सर्व अटी व शर्ती व कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या कंत्राटदारास कामाचे वाटप करुन कार्यारंभ आदेश देण्यात यावे व तसे या कार्यालयास कळविण्यात यावे म्हणजे संबंधीताला या कार्यालयाकडून नमूना नं.५ देण्यात येईल व त्या आधारे सदरील कंत्राटदार सहाय्यक कामगार आयूक्त, नांदेड यांच्या कार्यालयाकडून अनूज्ञप्ती प्राप्त करुन घेईल व विद्यापीठातील संबंधीत कार्यालयास सादर करील. तसेच सर्व प्रभारी अधिकारी/कार्यालय प्रमुख यांनी वेळोवेळी विद्यापीठाने निर्गमित केलेल्या परिपत्रका मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.३१/१०/२०२० पर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करावी.

**स्थळप्रतिवर कुलसचिव यांची स्वाक्षरी**

कुलसचिव

**प्रतिलीपी**:-संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण / नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी.यांना माहीतीस्तव.

**प्रत:-** १. सर्व प्रभारी अधिकारी /विभाग प्रमुख वनामकृवि, परभणी यांना कार्यवाहीस्तव.
२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि,परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर निर्गमित करावे.
३. मा.कुलगुरु, यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहीतीस्तव.